सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १५७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १६ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -५

# 'पंतप्रधान धन-धान्य कृषी योजने'साठी २४ हजार कोटींची तरतूद

## कृषी अर्थव्यवस्था आणि अक्षय ऊर्जेच्या क्षेत्रात देशाला बळकटी देण्यासाठी तीन मोठे निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६नवी दिल्ली-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाने बुधवारी (१६ जुलै २०२५) तीन मोठ्या निर्णयांना मंजुरी दिली आहे. कृषी अर्थव्यवस्था आणि अक्षय ऊर्जेच्या क्षेत्रात देशाला बळकटी देण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने ही पावले उचलली आहेत. यामध्ये प्रधानमंत्री धन-धन कृषी योजना इंडिया लिमिटेड यांचा समावेश आहे.

प्रधानमंत्री धन-धन कृषी योजना

धन-धन कृषी योजनेचे उद्दिष्ट शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवून आणणे आहे. या अंतर्गत कृषी जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सरकार ३६ केंद्रीय योजनांच्या समन्वयातून दरवर्षी २४,००० कोटी रुपये खर्च करेल. २०२५-२६ पासून सहा वर्षांसाठी प्रधानमंत्री धन-धन्य कृषी योजना ला मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्याचे लक्ष्य १०० कृषी जिल्हे विकसित करण्याचे आहे. ही



योजना नीती आयोगाच्या 'आकांक्षी जिल्हे' कार्यक्रमापासून प्रेरित आहे.

या योजनेचे उद्दिष्ट कृषी उत्पादकता वाढवणे, पीक विविधीकरणाला प्रोत्साहन देणे, शाश्वत कृषी पर्यायांचा अवलंब करणे, पंचायत आणि ब्लॉक पातळीवर साठवण सुविधा वाढवणे, सिंचन व्यवस्था सुधारणे हे आहे. ही योजना ११ मंत्रालयांच्या ३६ योजनांच्या समन्वयातून राबविली जाईल, ज्यामध्ये राज्य सरकारे आणि खाजगी क्षेत्राच्या भागीदारीच्या योजनांचाही समावेश असेल. कमी उत्पादकता, कमी पीक चक्र आणि कमी कर्ज वितरण अशा तीन प्रमुख निकषांच्या आधारे १०० जिल्ह्यांची निवड केली जाईल. प्रत्येक राज्यातील किमान एक जिल्हा समाविष्ट केला जाईल.

याशिवाय, मंत्रिमंडळाने एनटीपीसी लिमिटेडला अक्षय उर्जा क्षेत्रात विद्यमान मर्यादेपेक्षा जास्त २०,००० कोटी रुपयांपर्यंत गुंतवणूक करण्याची परवानगी दिली आहे. ही गुंतवणूक एनटीपीसी ग्रीन एनर्जी लिमिटेड (एनजीईएल) आणि त्यांच्या उपकंपन्यां आणि संयुक्त उपक्रमांद्वारे केली जाईल, जेणेकरून २०३२ पर्यंत ६० गिगावॅट अक्षय ऊर्जा क्षमता साध्य करता येईल.

### अक्षय ऊर्जा गुंतवणुकीसाठी एनटीपीसी ला २०,००० कोटी रुपये

केंद्रीय मंत्रिमंडळाने अक्षय ऊर्जेच्या क्षेत्रात विस्तार करण्यासाठी एनसीएल इंडिया लिमिटेड (छङउखङ) ला ७,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीला मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे, एनएलसीआयएल त्यांच्या पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या एनएलसी इंडिया रिन्यूएबल्स लिमिटेडमध्ये गुंतवणूक करू शकेल आणि त्या बदल्यात एनआयआरएल विविध प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करेल.

# राज्यातील 'त्या' २६ हजार शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी

## जुनी पेन्शन योजना खासगी शाळा कृती समितीचे निवेदन

विदर्भ प्रजासत्ताक **दि.१६मुंबई -** १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त आणि २००५ नंतर शंभर टक्के अनुदानावर आलेल्या खासगी शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू व्हावी, यासाठी महाराष्ट्रातील अन्यायग्रस्त २६ हजार शिक्षक



आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींनी, तसेच भंडारा जिल्ह्यात जुनी पेन्शन योजना खाजगी शाळा कृती समितीच्या वतीने १४ जुलैला राज्यभरातून जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांमार्फत राज्य सरकारला निवेदन दिले.

राज्य शासनाने १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त सर्वच विभागातील शासकीय आणि अशासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू केली. तसेच २००५ पूर्वी जाहिरात आणि २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांनाही जुनी पेन्शन योजना लागू केली आहे. मात्र, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त आणि जाहिरात आलेल्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील राज्यातील खासगी शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आलेली नाही.

### शासन सकारात्मक

८ जुलैला शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी शिक्षक संघर्ष संघटनेच्या अध्यक्षा डॉ. संगीता शिंदे यांना आजाद मैदानातील आंदोलन स्थळी सांगितले की, जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी सरकार सकारात्मक आहे. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयात कर्मचाऱ्यांच्या बाजूने सकारात्मक शपथपत्र सादर केले आहे. राज्यमंत्री पंकज भोयर यांनी देखील सभागृहात हेच मत व्यक्त केले.

# 'त्या' तहसीलदार बदलीप्रकरणी पालकमंत्र्यांनी मागितला अहवाल

## जिल्हा प्रशासनाचे मौन, एका पदासाठी दोन महिला नायब तहसीलदारात संगीतखुर्ची



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती-** शासनादेश डावलून विभागीय चौकशी सुरू असलेल्या नायब तहसीलदाराची मूळ महसुली जिल्ह्यात बदली केल्याचे वृत्त प्रकाशित झाले होते. पालकमंत्र्यांनी या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागितला. जिल्हा प्रशासन मात्र मौन पाळत आहे. दरम्यान एका पदासाठी दोन महिला नायब तहसीलदारांमध्ये सुरू असलेली संगीतखुर्ची सध्या महसूल विभागात चर्चेचा विषय बनली आहे.

महसूलमंत्र्यांच्या पालक जिल्ह्यात शासनादेशाला फाटा दिला गेल्याचे वृत्त पत्रात प्रसिद्ध होताच महसूल विभागात एकच खळबळ उडाली. ना. बावनकुळेपर्यंत हा विषय गेल्याने त्यांनी जिल्हाधिकारी व विभागीय माहिती देत प्रकरणाचा आयुक्तांना अहवाल मागितला. पालकमंत्र्यांचे विशेष कार्यासन अधिकारी योगेश कोठेकर यांनी याला दुजोरा दिला आहे.दरम्यान, एका आमदाराने 'त्या' महिला नायब तहसीलदाराच्या जागी 'डीई' सुरू असलेल्या महिला नायब तहसीलदार नियुक्तीसाठी पालकमंत्र्यांना पत्र दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

### बदली आदेशाला 'मॅट'चा स्थगनादेश

एकाच नायब तहसीलदाराच्या बदलीचे आदेश २६ जूनला महसूल विभागाने काढले. महिला अधिकाऱ्याने मॅटकडे दाद मागितली. या अर्जावर त्यांना स्टेटस्को नव्हे तर स्थगनादेश देण्यात आला. त्यामुळे या पदावर केलेली 'त्या' महिला नायब तहसीलदाराची बदली रद्द झाल्याचे गृहीत धरण्यात येत असल्याची माहिती महसूल अधिकाऱ्याने दिली.

# उद्धव ठाकरेंना सत्तेत येण्याचा स्कोपः त्यावर वेगळ्या पद्धतीने विचार करू

## अंबादास दानवेंच्या निरोप समारंभात मुख्यमंत्र्यांचे सूचक विधान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई -** विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा आज विधानपरिषदेत निरोप समारंभ पार पडला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दानवे यांचे कौतुक केले, त्याचसोबत हलकी टोलेबाजी देखील केली. उद्धव ठाकरे देखील यावेळी सभागृहात उपस्थित होते. यावेळी फडणवीसांनी ठाकरे यांना तुम्हाला इकडे यायचा पूर्ण स्कोप आहे, त्यावर आपण वेगळ्या पद्धतीने चर्चा करू असे सूचक विधान केले. त्यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, जोपर्यंत राहुल गांधी युवा नेता राहू शकतात तोपर्यंत आपण दोघेही युवा राहू शकतो, असे



म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंबादास दानवे यांना निरोप देताना म्हटले. अंबादास दानवे यांची राजकीय सुरुवात भाजपमधूनच सुरू झाले आहे. शिवसेनेत गेल्यानंतर त्यांनी विविध पदांवर काम केले. पत्रकारितेचा अभ्यास त्यांनी केले आहे. त्यामुळे अपेक्षा अशी होती की ते बातम्या संकलित करतील, पण ते बातम्या निर्माण करणारे झाले. एक चांगला नेता या सभागृहाला मिळाला. भाजपच्या मुशीत वाढल्यामुळे त्यांच्यात चिकाटीपणा पाहायला मिळते, संघटन कौशल्य पाहायला मिळते आणि संघटन कौशल्य पाहायला मिळते.

सामन्यांच्या प्रश्नांची जाण अंबादास दानवे यांना आहे. २०१९ ला ज्यावेळेस ते या पदासाठी निवडणूक लढले तेव्हा आम्ही सगळे एकत्र होतो आणि आम्ही पाठिंबा दिला होता. त्यांचा कार्यकाळ या ठिकाणी संपुष्टात येईल त्यानुसार विरोधी पक्षनेत्याचे देखील या ठिकाणी कार्य संपुष्टात येईल. त्यामुळे आता परब साहेब तयारी करून ठेवा, असे म्हणत फडणवीस यांनी अनिल परब यांना डिवचले.

### उद्धवजी तुम्हाला इकडे यायचा स्कोप

विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी अनेक प्रश्नांना हात घातला आहे. मी स्वतः देखील विरोधी पक्षनेता होतो, माझी तर पीएचडी आहे विरोधी पक्ष नेता म्हणून कसे काम करायचे. उद्धव ठाकरे यांना उद्देशून बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, उद्धवजी आता २०२९ पर्यंत काही करायचे नाही. आम्हाला तिकडे यायचा स्कोप उरला नाही. मात्र तुम्हाला इकडे यायचा स्कोप आहे. त्यावर वेगळ्या पद्धतीने विचार करता येईल. आपण वेगळ्या पद्धतीने बोलू.

# आनंदराज आंबेडकरांची एकनाथ शिंदेंना साथ

## शिंदेसेना-रिपब्लिकन सेनेच्या युतीची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई-** आगामी मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात नव्या युतीची घोषणा झाली आहे. आनंदराज आंबेडकर यांच्या रिपब्लिकन सेनेने एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला साथ दिली आहे. आज मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत आनंदराज आंबेडकर आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संयुक्तिक युतीची घोषणा केली आहे. शिंदे हे वेगळे नेते असून ते सर्वांना सोबत घेऊन जातात. कुठल्याही अटीशिवाय आम्ही ही युती करत आहोत. चळवळीतील नेत्यांना सत्तेत सहभागी करून घेण्याचं शिंदे यांनी म्हटलं आहे अशी माहिती आनंदराज आंबेडकर यांनी दिली.

या पत्रकार परिषदेत एकनाथ शिंदे यांनी म्हटलं की, आज आपल्या सगळ्यांच्या दृष्टीने आनंदाचा दिवस आहे. शिवसेना आणि रिपब्लिकन सेना या दोन्हीही सेना आहेत. रस्त्यावर अन्यायाविरोधात लढणाऱ्या सेना आहेत. एक बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा घेऊन चालणारी सेना आणि दुसरी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रक्ताचा वारसा घेऊन चालणारी सेना आहे. सीएम म्हणजे कॉमन मॅन म्हणून मी काम केले. सर्वसामान्य माणूस आणि कार्यकर्ता



हीच आपली सामाजिक बांधिलकी आहे. त्यामुळे तळागाळातील सामान्य माणसांशी नाळ तुटता कामा नये हे पथ्य पाळण्याचं काम आपण केले. आनंदराज आंबेडकर हेदेखील ज्यांनी या देशाची घटना लिहिली त्या बाबासाहेब आंबेडकर यांच्या रक्ताचे वारस आहेत. बाबासाहेबांच्या घटनेमुळे सर्वसामान्य माणूस उच्चपदावर पोहचला. संविधानामुळे मी मुख्यमंत्री झालो, नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान झाले. त्यामुळे संविधान महत्त्वाचे आहे. समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळाला पाहिजे. तो मुख्य प्रवाहात आला पाहिजे असं त्यांनी सांगितले. दरम्यान, शिवशक्ती-भीमशक्ती ही कार्यकर्त्यांची फौज असलेली सेना आहे. आपला वैयक्तिक अजेंडा नाही. सर्वसामान्य लोकांना न्याय मिळाला पाहिजे. कार्यकर्ता घरात नाही तर लोकांच्या दारात शोभतो. आरोग्याच्या सुविधा दिल्या, कुणीही उपचाराविना राहता कामा नये. लेक लाडकी योजना आणली. महाराष्ट्र पुढे जातोय. देशाच्या विकासात महाराष्ट्राचे योगदान मोठे ठरणार आहे.

# झुडपी जंगल प्रकरणी एकही गरीब बेघर होणार नाही!

## आठवड्यात एसओपी जारी होणारमहसूलमंत्री बावनकुळे यांचे आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६मुंबई-** विदर्भातील कोणताही गरीब माणूस 'झुडपी जंगल' जमिनींच्या नावाखाली बेघर होणार नाही, त्याला संपूर्ण संरक्षण देण्याचं काम सरकार करेल, कोणालाही वाऱ्यावर सोडणार नाही असं स्पष्ट आश्वासन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिले.येत्या आठवड्यात मानक कार्यप्रणाली (एसओपी) जारी होईल, ज्यामुळे स्थानिक जनतेचा संभ्रम दूर होईल. गरज भासल्यास पुनर्विचार याचिका दाखल करून सरकार विदर्भातील जनतेच्या हिताचे रक्षण करेल. असेही मंत्री बावनकुळे म्हणाले.

आमदार नानाभाऊ पटोले यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला, आमदार राजकुमार बडोले आणि संजय मेश्राम यांनी उपस्थित केलेल्या उपप्रश्नांनाही त्यांनी सविस्तर उत्तरे दिली.



महसूलमंत्री बावनकुळे यांनी सभागृहात स्पष्ट केले की, या प्रकरणात ९२ हजार ११५ हेक्टर जमिनीचा संबंध येतो. यातील ८६ हजार ४०९ हेक्टर जमीन वनीकरणासाठी अयोग्य आहे. यातील २७ हजार ५०७ हेक्टरवर अतिक्रमण आहे, तर २६ हजार ६७२ हेक्टर वनेत्तर वापरासाठी आहे. ३ हजार २२९ हेक्टर संरक्षित क्षेत्र आहे, जे हस्तांतरित करता येणार नाही, परंतु वापरता येईल. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, १९९६ पूर्वीच्या अतिक्रमणाची यादी तयार करून केंद्रीय वन मंत्रालयाला पाठवली जाईल. १९९६ नंतरच्या अतिक्रमणाबाबतही माहिती संकलित करून एका महिन्यात सादर केली जाईल. यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी बैठक होऊन शासन निर्णय जारी होईल असल्याचे महसूल मंत्री बावनकुळे म्हणालेत.

## संपादकीय ......

# महागाईतून दिलासा

जीवनावश्यक वस्तूंची वाढती दरवाढ, अत्यावश्यक सेवांच्या दरात वाढ आदी कारणाने सर्वसामान्यांना महागाईच्या झळा बसत असताना आणि त्याकारणाने जगणे असह्य होत असताना एक सुवार्ता आहे. या झळांची तीव्रता कमी झाली असून त्याचे बाजारावरील अनुकूल परिणामही दिसू लागले आहेत. अन्नधान्य आणि इंधनाच्या किमती लक्षणीयरीत्या घसरल्याने, जूनमध्ये घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर ०.१३ टक्क्यांवर घसरला. ऑक्टोबर २०२३ नंतर प्रथमच घाऊक महागाई दर शून्याखाली गेला. सोमवारी प्रसिद्ध झालेल्या सरकारी आकडेवारीनुसार, जून २०२५ मध्ये घाऊक महागाईचा नकारात्मक दर हा मुख्यतः अन्नधान्य वस्तू, खनिज तेल, मूलभूत धातूंचे उत्पादन आणि नैसर्गिक वायू इत्यादींच्या किमतींत घट झाल्याचा परिणाम आहे. इस्रायल विरुद्ध इराण युद्ध आणखी भडकले असते, तर कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू या दोन्हींचे भाव आकाशला भिडले असते. तशी चिन्हे दिसू लागलेली होती. परंतु युद्ध थांबल्यामुळे परिस्थिती सुधारली. ३० मे २०२५ रोजी कच्च्या तेलाचे दर प्रतिबॅरल ६२ डॉलर इतके खाली घसरले. परंतु इस्रायलने इराणमधील अण्वस्त्रांच्या ठिकाणांवर हावाई हल्ले केल्यामुळे हे भाव ७८ डॉलर प्रतिबॅरलवर पोहोचले होते. आता कच्च्या तेलाच्या किमती प्रतिबॅरल ६९ डॉलरच्या आसपास आलेल्या आहेत. केंद्रीय उद्योग मंत्रालयाने दिलेल्या निवेदनानुसार, भारतातील उत्पादित वस्तूंच्या किमतींतही घट झालेली आहे.

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारलेला महागाई दर मे २०२५ मध्ये ०.३९ टक्के होता. त्या तुलनेत जूनमध्ये त्यात ५२ आधारबिंदूंची घसरण झाली. २०२४ च्या जूनमध्ये भाववाढीचा दर ३.४३ टक्के इतका होता. मुळात यावर्षीच्या जूनमध्ये वार्षिक तुलनेत भाज्यांच्या किमती २२ टक्क्यांनी घसरल्या. त्याअगोदरच्या मे महिन्यात त्यात २१ टक्क्यांची घसरण झाली. यावेळच्या मे महिन्यात अन्नधान्यांच्या वस्तूंत १.५६ टक्के, तर जूनमध्ये पावणेचार टक्क्यांची घसरण झाली. इंधन आणि विजेच्या किमतीही २.६५ टक्क्यांनी जूनमध्ये कोसळल्या; तर उत्पादित वस्तूंच्या किमतीतील वाढ जूनमध्ये फक्त १.९७ टक्के इतकी होती. सणासुदीचे दिवस जवळ आल्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने महागाईबाबत दिलासा मिळणे, हे फार महत्त्वाचे आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात मध्यमवर्गीयांना आयकरावर अनेक सवलती जाहीर करण्यात आल्या. त्यामुळे भाववाढीला तोंड देणे त्यांना अधिक सोपे जात आहे.

केंद्र सरकारने राजकोषीय तुटीचे प्रमाण कमी केले आहे. २०२४ च्या अर्थसंकल्पातच 'खाद्यतेल मिशन'ची घोषणा करून त्यासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. कडधान्यांत आत्मनिर्भरता साधण्यासाठीही सहा वर्षे कालावधीची दीर्घकालीन योजना राबवली जाणार आहे. संपूर्ण खाद्यतेल आत्मनिर्भरता निदान पुढील २० वर्षांत तरी शक्य नसली, तरी मागील अनुभव पहिल्यास कडधान्यांतील आत्मनिर्भरता येत्या दोन वर्षांत गाठणे शक्य होईल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. कारण डाळींची टंचाई फार तीव्र नाही. तूर, मूग आणि मसूर या खाण्यासाठी वापराच्या दृष्टीने एकमेकींशी संलग्न असलेल्या डाळींचे एकूण उत्पादन जरी ३०-३५ लाख टनांनी वाढले, तरी ते पुरेसे आहे. कारण क्षेत्रवाढ आणि उत्पादकतावाढ असा दुहेरी प्रयत्न करून हरभर्याच्या उत्पादनातदेखील १०-१५ लाख टन वाढ सहज शक्य आहे. म्हणजे एकूण अतिरिक्त उपलब्धता ५० लाख टनांची झाल्यास आपण किमान कडधन्यांत आत्मनिर्भर होऊ शकू. कडधान्यांच्या क्षेत्रात २०१७ ते २०२१ या काळात भारत ८५ ते ९० टक्के आत्मनिर्भर होता.

मागच्या अर्थसंकल्पात पंचवार्षिक कालावधीचे 'कापूस मिशन' सुरू करण्याची घोषणा झाली. त्यात उत्पादकतावाढ आणि शाश्वतता या गोष्टींवर भर देण्यात आला आहे. उत्तम दर्जाच्या कापूस उत्पादनावर लक्ष्य केंद्रित करण्यात आले आहे. यामुळे आज ना उद्या कपड्यांचे भावही कमी होऊ शकतील. याव्यतिरिक्त मत्स्य उत्पादन आणि निर्यातीला उत्तेजन देण्यासाठी 'पंतप्रधान धनधान्य कार्यक्रमांतर्गत' १०० जिल्ह्यांत उत्पादकतावाढ अभियान राबवले जात आहे. दुसरीकडे, गेल्या काही दिवसांत आवक वाढल्यामुळे लसूण, घेवडा आणि शेवग्याच्या दरांतही घट झाली. भाज्या, डाळी, मांस आणि दुधासह अन्नपदार्थांच्या किमती कमी झाल्यामुळे जूनमध्ये किरकोळ महागाई दराची साडेसहा वर्षांतील विक्रमी अशी २.१० टक्क्यांपर्यंत घसरण दिसून आली. म्हणजे घाऊक किमतींबरोबरच किरकोळ किमतीही घसरत आहेत. एकीकडे हा दिलासा मिळत असला तरी यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच अवकाळीच फटका बसला. रिझर्व्ह बँकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी देशांतर्गत सकल उत्पादनवृद्धीचा, म्हणजेच जीडीपीवाढीचा अंदाज ६.५ टक्क्यांवर कायम ठेवला आहे. जागतिक अस्थिरता आणि अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्था स्थिर व समर्थ असून, नवनव्या संधी उपलब्ध होत असल्याचे आशादायी चित्र रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी अलीकडेच रंगवले आहे. मात्र भाववाढ कमी झाली असली, तरी शेतकर्याच्या मालाला पुरेसे भाव मिळत नाहीत आणि अतिवृष्टीमुळे तो अडचणीतही आला आहे. त्याचप्रमाणे देशातील उत्पादन क्षेत्राचा विकास अपेक्षेप्रमाणे नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. या स्थितीत त्याची झळ समाजातील कमुकवत घटकाला आणि कामगार वर्गाला बसते. त्याकडे लक्ष देताना अर्थव्यवस्थेच्या कमजोर स्थळांवर लक्ष्य केंद्रित केल्यासच गोरगरीब वर्ग व शेतकर्यांना खरा दिलासा मिळू शकेल.

# डाळिंब बागेवर रसशोषक किडींचा प्रादुर्भाव झालाय, असे करा नियंत्रण?



डाळिंब पिकातील किडी

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक**

डाळिंब या फळपिकावर येणाऱ्या विविध किडी आणि रोगांच्या नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. यात प्रामुख्याने रसशोषक किडींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होत असतो. या किडींचे नियंत्रण कसे करावे?

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

एकरी २४ नीळे व पिवळे चिकट सापळे बागेत नागमोडी पद्धतीने झाडाच्या उंचीच्या १५ सें. मी खाली लावावेत. पहिली फवारणी - रसशोषक किडींसाठी, ॲझाडिरेक्टिन (१०,००० पीपीएम) ३ मिली किंवा करंज तेल ३ मि.ली किंवा वरील दोन्ही एकत्रितपणे प्रत्येकी ३ मि.ली. अधिक स्टीकर स्प्रेडर ०.२५ मि.ली प्रतिलिटर पाणी प्रमाणे फवारणी करावी. (पावसाची उघडीप असताना फवारणी करावी)

**दुसरी फवारणी** - ७ ते १० दिवसांनी रसशोषक किडींसाठी, सायअँट्रानीलीप्रोल (१०.२६ ओडी) १.८ मि.ली. किवा थायमिथोक्साम (२५ डब्ल्यूजी) ०.५ ग्रॅम अधिक स्टीकर स्प्रेडर ०.२५ मि.ली. प्रतिलिटर पाणी प्रमाणे करावी.

**फुलधारणा अवस्था**- रसशोषक किडींसाठी, स्पिनेटोरम (११.७ एससी) ०.४ मि.ली. किवा स्पिनोसॅड (४५ एससी) ०.३ मि.ली. अधिक स्टीकर स्प्रेडर ०.२५ २५ मिली मिली प्रतिलिटर प्रतिलिटर पाणी प्रमाणे फवारावे. (पावसाची उघडीप असताना फवारणी रणी करावी)

**फळधारणा अवस्था**- रसशोषक कीड व फळ पोखरणाऱ्या अळीसाठी, साय अँट्रानीलीप्रोल (१०.२६ ओडी) १.८ मि.ली. किंवा क्लोर अँटानीलीप्रोल (१८.५ एससी) ०.३ मि.ली. किंवा टोल्फेनपायरेंड (१५ ईसी) २ मि.ली. किंवा फ्लोनिकामीड (५० डब्ल्यूर्जी) ०.४ ग्रॅम अधिक स्टीकर स्प्रेडर ०.२५ मिली प्रतिलिटर पाणी प्रमाणे फवारणी करावी.

- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




# कोलेस्टेरॉल घटवणारी फळे

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक**



हृदयविकार आणि स्ट्रोक यांसारख्या गंभीर आजारांचे प्रमुख कारण म्हणजे, धमन्यांमध्ये साचलेले खराब कोलेस्टेरॉल (डऊ). खराब कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी आणि हृदयाचे आरोग्य सुधारण्यासाठी काही फळे खूप प्रभावी ठरू शकतात. या फळांमध्ये अँटिऑक्सिडंटस्, फायबर आणि इतर पोषक तत्त्वे असतात, जी कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यास आणि धमनी स्वच्छ ठेवण्यास मदत करतात. चला जाणून घेऊ अशी कोणती फळे आहेत, जी तुमच्या आहारात समाविष्ट करून तुम्ही हृदयाचे आरोग्य सुधारू शकता.

**सफरचंद** :सफरचंदामध्ये पेक्टिन नावाचे फायबर असते, जे खराब कोलेस्टेरॉल (डऊ) कमी करण्यास मदत करते. याशिवाय, सफरचंदामध्ये अँटिऑक्सिडंटस् असतात जे धमन्यांमधील जळजळ कमी करतात आणि हृदयविकाराचा धोका कमी करतात. रोज एक सफरचंद खाल्ल्याने कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित राहते आणि हृदय निरोगी राहते.

**कसे खावे** : सफरचंद सलाडमध्ये, स्मुदीमध्ये किंवा थेट कच्चे खाऊ शकता. सालीसह खाणे अधिक फायदेशीर आहे. कारण, सालीत जास्त फायबर आणि अँटिऑक्सिडंटस् असतात.

**द्राक्षे** :द्राक्षांमध्ये रेस्वेराट्रॉल आणि फ्लाव्होनॉईडस्सारखे अँटिऑक्सिडंटस् असतात, जे खराब कोलेस्टेरॉल कमी करतात आणि धमन्यांमधील अडथळे दूर करतात. द्राक्षे रक्तप्रवाह सुधारतात आणि हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात. लाल आणि काळी द्राक्षे विशेषतः प्रभावी असतात.

**कसे खावे** : द्राक्षे ताजी खाऊ शकता, सलाडमध्ये मिसळू शकता किंवा त्यांचा रस पिऊ शकता. मात्र, रसात साखरेचे प्रमाण जास्त नसावे याची काळजी घ्या.

बेरी (स्ट्रॉबेरी, ब्ल्युबेरी, रास्पबेरी) :स्ट्रॉबेरी, ब्ल्युबेरी आणि रास्पबेरी यांसारख्या बेरींमध्ये अँटिऑक्सिडंटस् आणि फायबर मुबलक प्रमाणात असतात. यामुळे खराब कोलेस्टेरॉल कमी होण्यास मदत होते आणि धमन्यांमधील प्लाक तयार होण्यास प्रतिबंध होतो. बेरी हृदयाच्या आरोग्यासाठी आणि रक्तदाब नियंत्रित करण्यासाठीही उत्तम आहेत.

**कसे खावे** : बेरी स्मुदी, दही किंवा ओटस्सोबत खाऊ शकता. ताज्या किंवा गोठवलेल्या बेरी दोन्ही फायदेशीर आहेत.

**संत्री** :संत्री यांसारख्या लिंबूवर्गीय फळांमध्ये व्हिटॅमिन सी आणि फायबर असते, जे कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करते. यातील हेस्पेरिडिन नावाचे अँटिऑक्सिडंट धमन्यांचे आरोग्य सुधारते आणि रक्तप्रवाह वाढवते.

**कसे खावे** : संत्र थेट खाऊ शकता, त्याचा रस पिऊ शकता किंवा सलाडमध्ये समाविष्ट करू शकता.

**एव्होकॅडो** : एव्होकॅडोमध्ये हेल्दी फॅटस् (मोनोअनसॅच्युरेटेड फॅटस्) आणि फायबर असते, जे खराब कोलेस्टेरॉल कमी करून चांगले कोलेस्ट्रॉल (कऊ) वाढवते. यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो आणि धमनी स्वच्छ राहतात.कसे खावे : एव्होकॅडो सलाड, स्मुदी किंवा टोस्टवर लावून खाऊ शकता.

**डाळिंब** :

डाळिंबामध्ये शक्तिशाली अँटिऑक्सिडंटस् असतात, जे धमन्यांमधील प्लाक कमी करतात आणि रक्तप्रवाह सुधारतात. डाळिंबाचा रस नियमित प्यायल्याने खराब कोलेस्ट्रॉल कमी होऊ शकते आणि हृदय निरोगी राहते.

**कसे खावे** : डाळिंबाचे दाणे सलाडमध्ये टाकू शकता किंवा त्याचा ताजा रस बनवून पिऊ शकता.

# राजुरा, लोणी मंडळात शेतकऱ्यांना नुकसान भरपाईसाठी विलंब का?

## आमदार उमेश यावलकर यांनी विधानसभा सभागृहात उपस्थित केला प्रश्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६वरुड**- मोर्शी वरुड मतदार संघातील लोणी व राजुरा बाजार मंडळात झालेल्या नुकसानाची शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नाही. त्यांना मदत मिळण्यास विलंब का होत आहे, असा प्रश्न विधानसभेत आमदार उमेश यावलकर यांनी उपस्थित केला

वरूड तालुक्यातील लोणी व राजुराबाजार मंडळात २०२३ मध्ये नोव्हेंबर व डिसेंबरमध्ये अतिवृष्टी झाली होती. २०२४ मध्ये एप्रिलमध्ये दोन वेळा गारपीट झाली होती. यावेळी अतिवृष्टीने झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीपोटी बाधितांना मदत करण्यासाठी शासन निर्णयानुसार निधी वितरीत करण्यास शासनाने मंजुरात दिली होती. गारपीट व पावसामुळे शेती पिकांच्या झालेल्या नुकसानीपोटी बाधित शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासनाने मंजुरी दिली होती. त्यानंतर शासनाच्या आदेशानुसार शेतकऱ्यांनी केवायसी केली, परंतु त्यातील अनेक शेतकऱ्यांचे अनुदानाचे वाटप थांबविण्यात आले. वरूड तालुक्यासह विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकरी खरीप व रब्बी हंगामा प्रमाणे अंबिया व मृग बहार मधील संत्रा व मोसंबी फळपिकांचे दोन हंगामांमध्ये पीक घेतात, परंतु अवकाळी झालेला पाऊस व गारपीटमुळे राजुरा व लोणी मंडळातील संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागले होते, त्यामुळे संत्रा, मोसंबी फळपिकांचे दोन हंगाम लक्षात घेता संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना अतिवृष्टी व गारपीटचे अनुदान तात्काळ वाटप करण्याची मागणी आमदार उमेश यावलकर यांनी लावुन धरली आहे. कृषी विद्यापीठाच्या अहवालानुसार दोन हंगाम वेग वेगळे संत्रा हे बहुवार्षिक पिक असुन दोन हंगामात घेतले जाणारे पिक आहे. आ. यावलकर यांनी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या अहवालाचा व कृषी विभागाचा दाखला देत मृग व अंबिया दोन वेगवेगळे हंगाम असल्याचे सभागृहात सांगितले. एका हंगामात दोनदा झालेले नुकसान अनुदान अनुदेय ठरत नाही, परंतु दोन हंगामात वेगवेगळ्या वेळी झालेले नुकसान अनुदान अनुदेय ठरत असल्याचे त्यांनी पटवून दिले. त्यामुळे या मंडळातील शेतकऱ्यांचे २०२४ मध्ये गारपीटीमुळे झालेल्या नुकसान अनुदानाचे अनुदेय देतेवेळी शासनाकडून विलंब का होत आहे असा सवाल त्यांनी या वेळी उपस्थित केला.



# पोलिसांचे आरोग्य राखण्यास प्राधान्य: डीसीपी रमेश धुमाळ रुजू

## मुख्यालयाची सांभाळणार जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती**- अमरावती बहुतांशवेळी पोलिस ताणतणावात ड्युटी करतात. त्यामुळे त्यांचे शारीरिक आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे आगामी काळात पोलिसांच्या शारीरिक आरोग्यासह मानसिक आरोग्य कसे सुदृढ राहणार, यासाठी प्राधान्याने प्रयत्न करणार असल्याचे नव्यानेच रुजू झालेले डीसीपी रमेश धुमाळ यांनी 'दिव्य मराठी'सोबत बोलताना सोमवारी सांगितले. डीसीपी धुमाळ हे शनिवारी (दि. १२) अमरावती आयुक्तालयात रुजू झालेत. त्यांच्याकडे तूर्तास मुख्यालयाची जबाबदारी दिली आहे. २०१० च्या तुकडीचे ते थेट डीवायएसपी आहेत. त्यांचा परिविक्षाधीन कालावधी चंद्रपूर जिल्ह्यात झाला. त्यानंतर पहिली पोस्टिंग एसडीपीओ बाळापूरला (अकोला) झाली. रमेश धुमाळ हे मूळचे पुणे जिल्ह्यातील आहेत. ते सध्या नागपूरहून पोलिस उपायुक्त म्हणून अमरावतीत आले. रमेश



धुमाळ यांनी २००९ मध्ये एमपीएससीमार्फत घेण्यात आलेली पोलिस उपनिरीक्षक पदाची परिक्षा दिली होती. त्या परिक्षेत ते राज्यातील टॉपर होते. मात्र त्यांनी पीएसआय म्हणून नोकरी स्विकारली नव्हती. त्याचदरम्यान अन्य एका परिक्षेतून त्यांचे थेट नायब तहसिलदार म्हणूनही सिलेक्शन झाले होते. इतक्यातच ऑक्टोंबर २०१० मध्ये ते थेट डिवायएसपी म्हणून सिलेक्ट झाले व त्यांनी पोलिस खात्यात सेवा सुरू केली.

# मिशन फुटपाथ फ्रीडम अंतर्गत अतिक्रमणावर धडक कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती,** झोन क्रमांक ३ मधील दस्तुरनगर क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली.

राजेंद्र कॉलनी ते मोती नगर या मार्गावर करण्यात आलेल्या कारवाईत रस्त्यावर अडथळा निर्माण करणाऱ्या हातगाड्या, फळ विक्रेते, लोखंडी पानठेले तसेच हॉटेलच्या बाहेर वाढवून ठेवलेले शेड यावर महानगरपालिकेच्या अतिक्रमण पथकाद्वारे कठोर कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत बरेच साहित्य जप्त करण्यात आले असून काही अतिक्रमणांची थेट तोडफोड करण्यात आली. या कारवाईत सुमारे २ ट्रक भरभरून साहित्य जप्त व नष्ट करण्यात आले आहे.

ही कारवाई सध्या देखील सुरू असून नागरिकांचा चालण्या-फिरण्याच्या हक्कासाठी सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमणमुक्त मोहिमेला वेगाने चालना दिली जात आहे. महानगरपालिकेचे अतिक्रमण पथक, संबंधित विभाग अधिकारी, पोलीस प्रशासन व अन्य कर्मचारी यांनी संयुक्तपणे ही कारवाई यशस्वीपणे पार पाडली.

महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी स्वयंप्रेरणेने अतिक्रमण हटवावे अन्यथा कठोर कारवाई केली जाईल.सदर कार्यवाही दरम्यान अतिक्रमण पथक प्रमुख श्याम चावरे, पोलिस विभागाचे महिला कर्मचारी, निरीक्षक शहबान, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १६ जुलै २०२५

शहर/ग्रामिण


# वेलकम टी पॉईंट अतिक्रमण कारवाईत राडा

# अंगावर पेटोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न

## पोलिसांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला, वेलकम टीपाईन्ट ते रहाटगाव मार्गावरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती –** गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वेलकम टीपॉईंट ते रहाटगाव दरम्यान महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने सोमवारी मोठी कारवाई केली. या दरम्यान, एका चायनीज ठेलेवाल्याने अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केल्यानेएकचखळबळ उडाली. बंदोबस्तात असलेल्या पोलिसांनी तात्काळ धाव घेत ठेलेवाल्याच्या हातून पेट्रोलची छोटी कॅनहिसकल्याने मोठा अनर्थ टळला.

माहितीनुसार, महापालिकेच्या अतिक्रमण पथकाने यापूर्वी या परिसरातील हॉकर्स व ठेलेवाल्यांना अतिक्रमण स्वतःहूनहटवण्याच्या नोटीसाही दिल्या होत्या. मात्र, अतिक्रमणाचे प्रमाण वाढल्याने सोमवारी पोलिस बंदोबस्तात अतिक्रमण निर्मूलनाची मोठी कारवाई करण्यात आली. या कारवाईत रस्त्यावरील सुमारे ट्रकभर अतिक्रमित साहित्य आणि पाच समाजकल्याणचे खोके जप्त करण्यात आले. याच दरम्यान भीमनगरातील एका चायनीज ठेलेजवळ पथक पोहोचले असता, संबंधित ठेलेवाला आपल्या गर्भवती पत्नीला घेऊन तेथे आला.त्याने ठेला जप्त होऊ नये म्हणून अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला.




घटनेची गंभीरता लक्षात घेता बंदोबस्तातील पोलिसांनी तात्काळ धाव घेत त्याच्याकडील पेट्रोलची कॅन हस्तगत केली आणि त्याला पकडले. पोलिसांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला. पुढे या युवकाने पुढे अतिक्रमण करणार नाही अशी कबुली दिल्यानंतर पथकाने त्याचा ठेला परत दिला.आणि त्याला पुन्हा अतिक्रमणन करण्याची नोटीसही बजावली. पत्नी गर्भवती असल्याने त्याच्यावर कोणतीही कठोर कारवाई करण्यात आली नाही, अशी माहिती अतिक्रमण विभाग अधीक्षक योगेश कोल्हे यांनी दिली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिस आणि महापालिकेच्या सूज्ञ हस्तक्षेपामुळे परिस्थिती नियंत्रणात आली

# २०६८ कंट्रोल युनिट, २०८२ बॅलेट युनिट पोहोचले तालुकास्तरावर

## लवकरच इव्हिएमची होणार पडताळणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती–** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाने सुद्धा जोरात तयारी






सुरु केली आहे. या अनुषंगाने जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. प्रभाग रचना कार्यक्रमासोबतच जिल्ह्यातील सर्वच १४ तालुक्यांमध्ये २०६८ कंट्रोल युनिट व २०८२ बॅलेट युनिट वाटप करण्यात आले आहे. लवकरच तालुका स्तरावर ईव्हिएमची पडताळणी केली जाणार आहे.जिल्ह्यात गत साडेतीन वर्षांपासून जिल्हा परिषदेसह १४ पंचायत समित्यांमध्ये प्रशासक राज आहे. गावपुढाऱ्यांना निवडणुकीची प्रतीक्षा लागली असताना शासनाकडून या निवडणुकीच्या अनुषंगाने तयारी सुरू केली आहे. या प्रक्रियेला आता वेग आला असून आयोगाकडून प्रभाग रचना सोमवारी जाहीर करण्यात आली.सन २०१७ च्या प्रभाग रचनेप्रमाणे प्रभागरचना कायम ठेवण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे ५९ तर पंचायत समितीचे ११८ सर्कलया निवडणुकीत राहणार आहे.

### १८ ऑगस्टपर्यंत कार्यक्रम चालणार

यामध्ये केवळ चांदूर रेल्वे तालुक्यातील एक जिल्हा परिषद सर्कल व दोन पंचायत समिती सर्कल रद्द करण्यात आले असून अचलपूर तालुक्यात एक जिल्हा परिषद आणि दोन पंचायत सर्कलच्या नावात बदल करण्यात आला आहे. १८ ऑगस्ट पर्यंत हा कार्यक्रम चालणार असून त्यानंतर प्रत्यक्षात निवडणुकीला वेग येण्याची शक्यता आहे.

२०६८ कंट्रोल युनिट दाखल याच पार्श्वभुमीवर निवडणुक विभागाने जिल्ह्यातील अमरावती, भातकुली, नांदगाव खंडेश्वर, चांदुर रेल्वे, धामणगाव रेल्वे, तिवसा, मोर्शी, वरुड, चांदुर बाजार, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, अचलपूर, चिखलदरा आणि धारणी अशा १४ ही तालुका स्तरावर २०६८ कंट्रोल युनिट व २०८२ बॅलेट युनिट रवाना केले आहे. सर्व कंट्रोल युनिट आणि बॅलेट युनिटची तालुकास्तरावर पहिली पडताळणी लवकरच होणार आहे. त्यामुळे निवडणूक विभागात आता जिप, पंस.निवडणूक कामाची लगबग सुरु झाल्याचे दिसत आहे.

# अमरावतीच्या मंदारिन संत्र्यांना कांस्यपदक

## ‘एक जिल्हा, एक उत्पादन-२०२४’ पुरस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती, –** जिल्ह्याने ‘एक जिल्हा, एक उत्पादन–२०२४’ पुरस्कारात मंदारिन संत्र्यांसाठी कृषी क्षेत्रातील अ श्रेणी अंतर्गत तृतीय स्थान मिळवले. संत्रा उत्पादनातील सातत्य, गुणवत्ता आणि बागायती क्षेत्रातील उत्कृष्ट प्रयत्नामुळे जिल्ह्याने यश संपादन केले आहे.




जिल्हा उद्योग केंद्रांचे महाव्यवस्थापक नीलेश निकम यांनी कांस्यपदकाचा पुरस्कार स्विकारला.एक जिल्हा एक उत्पादन २०२४ अंतर्गत जिल्ह्याने चमकदार कामगिरी केली आहे. सोमवार, दि. १४ जुलै रोजी नवी दिल्ली येथील भारत मंडपममध्ये राष्ट्रीय ‘एक जिल्हा, एक उत्पादन’२०२४ पुरस्कार सोहळा पार पडला. केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि वाणिज्य व उद्योग राज्यमंत्री जितिन प्रसाद यांच्या प्रमुख उपस्थित पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.‘एक जिल्हा, एक उत्पादन’उपक्रम केंद्र शासनाचा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे.

यात प्रत्येक जिल्ह्याच्या वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देऊन जागतिक बाजारपेठेत त्याचा ठसा उमटविण्यात येत आहे.

# पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले पत्र

## वाढोणा रामनाथला पोलीस स्टेशन मंजूर करा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नांदगाव खंडेश्वर –** नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील वाढोणा रामनाथ येथे पोलीस स्टेशन मंजूर करण्याची मागणी तीव्र होत चालली आहे. मंगरूळ चव्हाळा पोलीस स्टेशनपासून तब्बल १८ किमी अंतरावर असलेल्या या गावात कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस उपस्थितीचा अभाव सतत जाणवतो. रात्रीच्या वेळी कोणतीही आपत्कालीन घटना घडल्यास मंगरूळ चव्हाळा पोलीस स्टेशनपर्यंत जाण्यासाठी वाहन उपलब्ध होत नाहीत.वाढोणा रामनाथ हे गाव अकोला, यवतमाळ व अमरावती आणि वाशिम या चार जिल्ह्यांच्या सीमेवर वसलेले आहे. येथे गुन्हा घडल्यानंतर आरोपी इतर जिल्ह्यांत पसार होण्याची शक्यता वाढते. यामुळे गुन्हेगारांवर वेळीच कार्यवाही करणे अशक्य ठरत आहे. या पार्श्वभूमीवर येथे स्वतंत्र पोलीस स्टेशनची नितांत गरज असल्याची मागणी ग्रामस्थ आणि आजूबाजूच्या १० ते १५ गावातील नागरिकांनी केली आहे.

मागणीसाठी अनेक वेळा शासन दरबारी निवेदने देण्यात आली, मात्र कोणताही ठोस निर्णय न झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी पसरली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री ना चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदर्भात लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे निर्देश पत्राद्वारे जिल्हा



ग्रामीण पोलीस अधिक्षक याना दिलेले असल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. शासनाकडून या मागणीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केलेला आहे.या मागणीच्या पूर्ततेकरिता आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे. सध्या वाढोणा रामनाथ हे केवळ एक व्यापारी केंद्र नसून अनेक शैक्षणिक, सामाजिक आणि औद्योगिक, ’उपक्रमांचे केंद्र बनले आहे. त्यामुळे येथे पोलीस ठाणे उभारणे ही काळाची गरज असून शासनाने या मागणीवर निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

### शासनाकडे प्रस्ताव पाठवणार



परिसरात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी आवश्यक उपाययोजना राबवणार आहोत. जोपर्यंत त्या भागात पोलीस स्टेशन स्थापन होत नाही, तोपर्यंत पेट्रोलिग वाढविण्यावर विशेष भर राहील. गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आम्ही कठोर पावले उचलू. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार पुढील आवश्यक कार्यवाही लवकरच करण्यात येईल. पोलीस स्टेशन मंजूर करणे हा शासनाचा अधिकार असून, त्यासंदर्भात आम्ही प्रस्ताव तयार करून लवकरच संबंधित यंत्रणेकडे पाठविणार आहोत. त्यांच्या मंजुरी करीता आम्ही पाठपुरावा करू.

**– विशाल आनंद (ग्रामीण पोलीस अधीक्षक)**

# कोणत्याही परिस्थितीत शहराची संस्कृती बिघड दिली जाणार नाही

## सीपी अरविंद चावरिया यांचा इशारा, फेक वेडिंग पार्टीवर पोलिसांचा चाप, पालकांनीही लक्ष देण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती–** अमरावती ही धर्मनगरी, शिक्षणनगरी असून येथे आपली एक समृद्ध सांस्कृतिक परंपरा आहे. ही परंपरा बिघडू दिली जाणार नाही. फेक वेडिंग पार्टीच्या नावाखाली चालणारा नंगानाच शहरात खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांनी दिला. प्रसार माध्यमांशी बोलतांना सीपी चावरिया यांनी सांगितले की फेक वेडिंग पार्टी प्रकरणावर परखड भाष्य केले. त्यांनी सांगितले की, या प्रकरणात गुन्हे शाखा युनिट क्रमांक २ चे निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली बारवर छापा टाकण्यात आला. यामध्ये डान्स आणि नशेबाजी करताना अनेक युवक–युवती आढळून आले. अशा पार्टी केवळ शनिवार रविवारपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. आता कोणत्याही दिवशी पार्टी होत आहे. यात १५–१६ वर्षांचे अल्पवयीन मुलं–मुली सहभागी होत असून, त्यांना हार्ड ड्रिंक्स दिले जात आहेत. बाहेरून आलेले युवक नशेत डान्स करत



असल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यानुसार एरिया–९१ रेस्टोबार प्रकरणात १७ वर्षीय अल्पवयीन युवतीसह आनंद राजू भेले, सहेम हेमंत बजाज, मानव पमनानी, लोक वैद्य, कुणाल पाल यांच्यावर बीएनएस कायद्यानुसार व बाल न्याय अधिनियमांतर्गत विविध कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले असल्याचे सीपी चावरिया म्हणाले. सीपी चावरिया यांनी आवाहन केले की, अरविंद चावरिया नागरिकांनी शहरात अशा फेक पार्टीज, नशेखोरी, अनैतिक कृत्ये कुठे होत असल्याची माहिती पोलिसांना द्यावी. संबंधितांची ओळख गोपनीय ठेवली जाईल. शहराची सांस्कृतिक ओळख टिकवण्यासाठी नागरिक व पालकांनीही आपली भूमिका पार पाडावी, असे ते म्हणाले.

### पालकांची जबाबदारी अधोरेखित

सीपी चावरिया यांनी पालकांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत विचारले की, रात्री उशिरापर्यंत घरी न परतणाऱ्या मुलांकडे लक्ष का दिलं जात नाही?पालकांनी आपल्या मुलांना दिली जाणारी पॉकेट मनी, त्यांचा वेळ कोणासोबत जातो, कुठे जातात याकडे लक्ष देणे ही प्राथमिक जबाबदारी आहे.

### फेक पार्टी विरोधातील कारवाई सुरूच राहणार

सीपी चावरिया यांनी स्पष्ट केले की, अशा पार्यािवरोधातील पोलिसांची कारवाई पुढेहीसुरुच राहणार आहे. रात्रीच्या वेळी संशयितांवर कॉम्बिंग ऑपरेशन व नाकाबंदीद्वारे लक्ष ठेवले जात आहे. ऑपरेशनच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे एका खुनाचा उलगडा झाला तसेच नांदगाव पेठेत लूटमार करणारे सहा आरोपी अटकेत घेतल्याचे त्यांनी सांगितले.

# सर्व विभागांनी संवेदनशील घटकांसाठी सचेत राहावे- जिल्हाधिकारी आशिष येरेकर

## तृतीयपंथीयांच्या दत्तक बाळाला लिंग प्रमाणपत्र सुपूर्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती,** कोणत्याही घटकांशी भेदभाव होणार नाही, याची काळजी सर्वांनी घ्यावी. यासोबतच एचआयव्ही संबंधित घटकातील एचआयव्ही संक्रमित व्यक्ती, तृतीयापंथी, वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया, स्तलांतरीत कामगार, ट्रक ड्रायव्हर, तसेच त्यांच्या सोबत असलेले सहकारी, यांच्या संदर्भात ओळखपत्र आणि



सामाजिक सुरक्षेंतर्गत दिल्या जाणाऱ्या योजना देताना सर्व विभागांनी सचेत असावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समितीची सभा नुकतीच पार पडली. यात विशेष बाब म्हणून तृतीयापंथींनी दत्तक घेतलेल्या बाळाचे लिंग प्रमाणपत्र जिल्हाधिकारी यांचे हस्ते सुपूर्द करण्यात आले. लिंग प्रमाणपत्राबाबत अडचण निर्माण झाली होती. यात एक विशेष समिती स्थापन करून निर्णय घेण्यात आला आहे. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, परिविक्षाधिन अधिकारी शैलेजा एम., जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले आदी उपस्थित होते.बैठकीला महानगर पालिका आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, बाह्यसंपर्क वैध्यकीय अधिकारी डॉ प्रशांत हेडाऊ, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. परिसे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रमेश बनसोड, शहरी क्षयरोग अधिकारी डॉ. फिरोज खान, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय साखरे आदी उपस्थित होते.

# नांदगाव खंडेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीला मिळाला ‘ब’ वर्ग दर्जा

## विकासकामांसोबतच शेतकऱ्यांचा विश्वास सार्थकी लागला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नांदगाव खंडेश्वर –** अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अभिजित पाटील ढेपे यांच्या नेतृत्वाखालील नांदगाव



खंडेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीने गेल्या दोन वर्षांत उल्लेखनीय विकास साधला असून, त्याचे फलित म्हणून या बाजार समितीला नुकताच ‘ब’ वर्ग दर्जा प्राप्त झाला आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये बाजार समितीच्या माध्यमातून एकूण १ कोटी ७५ लाख रुपये खर्च करून विविध विकासकामांची पूर्तता करण्यात आली आहे. या कामांमध्ये शेतकऱ्यांच्या माल टाकण्यासाठी ६५ गुणिले १०० चौरस फूट आकाराचे दोन लिलाव ओटे, ८० टन क्षमतेचा वजन काटा, तसेच आधुनिक तंत्रज्ञान वापरून बनवलेले अंतर्गत रस्ते आणि सौर ऊर्जा प्रणालीचा समावेश आहे.सध्या जवळपास २ कोटी ७५ लाख रुपये किमतीची विकासकामे प्रस्तावित असून त्यामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन अंतर्गत १ कोटी ५२ लाख रुपये खर्चाचे काम अंतिम टप्प्यात आहे. कृउबासने मागील काही दिवसांत विकास कामांची झडी लावली असून ती नेटाने पूर्ण केली जात आहेत. तसेच विविध योजना तयार असून या योजनांचीही अंमलबजावणी लवकरच केली जाणार आहे.

# आठवडी बाजारात गावरान कैऱ्याची आवक वाढली

## बाभुळगावचे व्यापारी, गृहिणींकडून मागणी मसाल्याच्या साहित्याची खरेदी वाढली



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती–** मागील तीन दिवसांपासून वर्षभराच्या लोणच्यासाठी लागणारी गावरान व अन्य प्रजातीच्या कैरी मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी दाखल होत आहे. अमरावती शहरातील रूक्मिणी नगर चौक, राजापेठ चौक व आठवडे बाजारात महिला ग्राहक खरेदीसाठी गर्दी करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. यातून बाजारात लाखो रुपयांची उलाढाल होत आहे. उन्हाळ्याची दाहकता संपल्यानंतर पावसाचे काही प्रमाणात शहर व तालुक्यात आगमन झाले आहे. दरम्यान वातावरणात गारवा निर्माण झाल्यामुळे लोणच्यासाठी कैरी व लोणच्यासाठी आवश्यक असलेले गरम मसाले, लसूण, धने, हिंग, मोहरीची डाळ आदी खरेदी करण्यासाठी महिलांची बाजारात गर्दी होत आहे. दरवर्षी साधरणतः जूनच्या दुसऱ्या आठवड्यात कैरीची आवक बाजारात होते, परंतु या वर्षी उशिराने जुलै महिन्याच्या मध्यान्हापासून कैरी बाजारात विक्रीसाठी उपलब्ध झाली आहे. सद्यःस्थितीत लोणच्याच्या कैरीचे ९० ते १०० रुपये किलो दर आहेत. बाहेर जिल्ह्यातील अनेक व्यापारी बाजारात कैरी विक्रीसाठी आणतात. कैरीची आवक जशी जास्त होत आहे, तशी कैरी खरेदी करणाऱ्यांची गर्दी देखील वाढत असल्याचे चित्र बाजारात पाहायला मिळत आहे. बाहेर विविध प्रकारचे तयार चटकदार लोणचे मिळत असले, तरी घरच्या लोणच्याची सर कशालाही नाही, हेच वास्तव बाजारातील कैरी खरेदीच्या गर्दीवरून दिसून येत आहे.

# शेत विकण्याच्या वादातून दोन गटात हाणामारी

## तलवारी व देशी कट्टे काढल्यामुळे परिसरात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती –** शेत विकण्याच्या वादातून दोन गटात सोमवारी रात्री चांगलीच हाणामारी झाली. हल्लेखोरांनी तलवारी व देशी कट्टे काढल्यामुळे परिसरात चांगलीच खळबळ उडाली होती. या घटनेत बडनेरा पोलिसांनी परस्परविरोधी तक्रारीवरून गुन्हे दाखल केले आहेत.बडनेरा येथील माजी नगरसेवक मोहम्मद इम्रान मोहम्मद सईद (वय ४० रा. जुनीवस्ती, बडनेरा), अब्दुल मोबीन व प्रवीण राठोड तिघांनी मिळून यवतमाळ जिल्ह्यात २३.५० एकर शेत काही वर्षांपूर्वी विकत घेतले होते. दरम्यान माजी नगरसेवक इम्रान यांना पैशाचे काम असल्यामुळे त्यांनी त्यांच्या हिस्स्याचे शेत विकण्याकरिता अब्दुल मोबीनला म्हटले होते. परंतु त्यांनी शेताची हिस्सेवाटणी करण्याचा सल्ला दिला होता. त्यामुळे त्यांच्यात काही दिवसापासुन वाद सुरु होता. दरम्यान माजी नगरसेवक व त्यांच्या नातेवाईकांनी सोमवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास अब्दुल मोबीनच्या घरावर घातक शस्त्रासह हल्ला केला. त्यामुळे दोन्ही परिवारातील युवक समोरासमोर आले आणि चांगलीच



हाणामारी झाली. दोन्ही परिवारातील युवक तलवारी व देशी कट्टे घेऊन एक दुसऱ्यावर हल्ला करीत असल्याची माहिती बडनेरा पोलिसांना मिळताच पोलिसांचा ताफा घटनास्थळी पोहचला आणि सर्व हल्लेखोरांना ताब्यात घेतले. दोघांच्या तक्रारीवरून गुन्हे दाखल केले. यामध्ये शेख मोहम्मद इम्रान अब्दुल सईद यांच्या तक्रारीरूनअब्दुल मोसीन अब्दुल रशीद, अब्दुल नईम अब्दुल रशीद, अब्दुल नदीम अब्दुल रशीद, अब्दुल मुकीम अब्दुल फारुख, अब्दुल माफिया अब्दुल मोबीन आणि दोन अनोळखी मुले यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला. तर अब्दुल मोबीन अब्दुल रशीद (वय ४१) यांच्या तक्रारीवरून मोहम्मद इम्रान मोहम्मद सईद, मोहम्मद उमेर, मोहम्मद फैजान अब्दुल सत्तार, मोहम्मद नदीम अब्दुल, अब्दुल वसीम अब्दुल खालीक यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धामणगाव बाजारसमिती हद्दीतील मांसविक्रीची दुकाने हटविली !

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६धा.रेल्वे–** धामणगाव रेल्वे शहरातील अंडरब्रिज मार्गावरील व परसोडी रस्त्यावरील उघड्यावर धाटलेली अवैध मांसविक्री दुकाने बाजारसमिती प्रशासनाने मंगळवारी ता. १५ रोजी हटवली. येथील परिसरातील नागरिकांच्या तक्रारींवर बाजारसमितीचे सचिव प्रवीण वानखडे यांनी कार्यतत्परतेने अतिक्रमण हटविल्याने रहदारीच्या मार्गाने मोकळा श्वास घेतला आहे.

परसोडी मार्गालगत असलेल्या रहिवासी नागरिकांनी आ. प्रताप अडसड, तहसीलदार अभय घोरपडे, पंचायतसमितीगटविकास अधिकारी व बाजारसमिती प्रशासनाला निवेदन देऊन तक्रार नोंदवली होती. आ. प्रताप



अडसड यांनी तातडीने दक्षता घेऊन प्रशासनाला निर्देश दिले होते. संबंधित विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन बाजारसमिती प्रशासनाने संबंधित मांसविक्री करणाऱ्या अतिक्रमण धारकांना तत्काळ नोटीस बजावली व मंगळवारी सदरअतिक्रमण हटविण्यात आले.जुना धामणगाव हद्दीतील परसोडी रस्त्यालगत कॉलनी परिसरातील नागरिकांना सदर मांसविक्री दुकानांचा प्रचंड त्रास होत होता. बाजारसमिती हद्दीतील दुकाने हटली: मात्र नगरपरिषद व जुना धामणगाव हद्दीतील मांसविक्री दुकानांना नोटीस प्राप्त न झाल्याने येथील अवैध मांसविक्री थांबलेली नाही, हे येथे उल्लेखनीय.

# 'रॉयल स्टॅग' च्या बॉटलमध्ये 'गोवा कंपनी'ची दारु

## वसंत टॉकीज येथील गोदामातून बिअरबारमध्ये जात होता साठा

विदर्भ प्रजासत्ताक **दि.१६अमरावती** – रॉयल स्टॅग दारुच्या रिकाम्या बॉटलमध्ये गोवा कंपनीची दारु टाकून ती ग्राहकांना विकणाऱ्या दोघांना गुन्हे शाखा युनिट वनच्या पथकाने अटक केली. त्याच्या ताब्यातून ३ लाख १४ हजार ४२५ रुपयांचा दारु साठा जप्त केला. गौरव उर्फ विक्की किशोर मातोले (गुप्ता) आणि राजू सुनिल साहू अशी अटकेतील दोघांची नावे आहेत. एका मालवाहू ऑटोरिक्षामधून शहरात मोठ्याप्रमाणात बोगस दारु शहरात आणली जात आहे. तसेच रॉयल स्टॅग दारुच्या रिकाम्या बॉटलमध्ये गोवा कंपनीची दारु पॅकींग करून ती ग्राहकांना विकली जात



असल्याची माहिती युनिट वनच्या पथकाला मिळाली. त्यांनी संबंधित युवकांवर बारकाईने लक्ष ठेवले. मंगळवारी मध्यप्रदेश येथून गोवा कंपनीची दारु घेऊन शहरात येतानाच स्विफ्ट कारसह दारु साठा जप्त केला. दोघांना चौकशीत घेतले. वसंत टॉकीजलगत गोडाऊन आहे, असे त्यांनी पोलिसांना सांगितले. पोलिसांनी गोदामाची पाहणी केली असता त्यामध्ये वेगवेगळ्या कंपनीची दारु व रिकाम्या बॉटल आढळल्या. तो मुद्देमाल जप्त केला. राज साहू यांच्या मालकीचे रहाटगाव येथील रिच गार्डन हॉटेलची सुध्दा पाहणी केली.

# मेळघाटातील ३३ केव्ही उपकेंद्र, महामार्ग व बससेवांच्या समस्या सोडवा

## आ. केवलराम काळे यांची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मेळघाट –** मेळघाट मतदारसंघाचे आ. केवलराम काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेतली. या भेटीत मेळघाटातील दीर्घकालीन प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करत आ. काळे यांनी अनेक महत्त्वाच्या मागण्या मांडल्या. मुख्यमंत्री यांच्याकडे त्यांनी या मागण्यांची लेखी स्वरूपात निवेदनाद्वारे मांडणी केली.या भेटीदरम्यान आ. काळे यांनी सर्वप्रथम मेळघाटातील २२ केव्ही जारिदा उपकेंद्राचा प्रश्न लवकरात लवकर मार्गीलावण्याची मागणी केली.



या उपकेंद्राअभावी धारणी तालुक्यातील अनेक दुर्गम आदिवासी गावांमध्ये आजही सुरळीत वीजपुरवठा होत नाही. शैक्षणिक संस्था, आरोग्यसेवा आणि शेतकऱ्यांच्या सिंचनासाठी आवश्यक असलेली वीज उपलब्ध नसल्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या अर्डचणीचा सामना करावा लागत आहे.त्यानंतर परतवाडा ते धारणी हा महामार्ग घोषित करण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली. सद्यस्थितीत या मार्गावर असंख्य खड्डे असून नागरिकांच्या दैनंदिन प्रवासात गंभीर अडथळे निर्माणहोत आहेत. हे रस्ते अत्यंत अपघातप्रवण बनले असून, पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात पडणाऱ्या या रस्त्यांचे नियोजनबद्ध रूपाने महामार्गामध्ये रूपांतर होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.त्याचबरोबर मेळघाटमधील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी 'मानव विकास कार्यक्रम अंतर्गत ५५ बस उपलब्ध करून द्याव्यात, अशी आग्रही मागणी आ. काळे यांनी केली. या भागातील विद्यार्थी दररोज शाळा गाठण्यासाठी मोठ्या अंतरावरून चालत जातात. त्यामुळे शालेय शिक्षणात मोठा अडथळा निर्माण होतो. बससेवा उपलब्ध झाल्यास विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सकारात्मक बदल घडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सर्व मागण्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित विभागांकडून लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन आमदार काळे यांना दिले.

# दुर्गम भागातील वीज समस्या घेतल्या जाणून

## ब्लॅक स्पॉट शोधून दुरूस्ती कार्याला सुरूवात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती,** मेळघाटात महावितरणची वीज असलेल्या जरीदा परिसरातील दुर्गम गावात प्रत्यक्ष भेट देत महावितरण अधिकारी व कर्मचारी यांनी वीज समस्येबाबत माहिती घेतली, सुरळीत वीजेसाठी देखभाल दुरूस्तीच्या कार्याला प्रत्यक्ष सुरूवात करण्यात आली , तसेच वीज पुरवठ्याशी संबंधित महावितरण कार्यालयात तक्रार आल्यास, तक्रार सोडविण्या साठी तातडीने कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अभियंता प्रदिप अंधारे यांनी दिली. अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात कार्यकारी अभियंता प्रदिप अंधारे यांनी पुढाकार घेत उपकार्यकारी अभियंता ,निलेश बोरीकर,वितरण केंद्र प्रमुख अजय टाले व कर्मचारी यांच्या सह जरीदा भागातील जरीदा कुही, हातरू, रूही, पाथर, डोमा, एकताई ,सलीता, भांडूम,बोदू आणि सुमिता या गावांना प्रत्यक्ष भेटी दिल्या,वीज पुरवठ्यात नियमित निर्माण होणाऱ्या समस्या याबाबत ग्रामस्थांसोबत चर्चा करून उपायोजना करण्याचे निर्देश कर्मचाऱ्यांना दिले.तसेच यावेळी



आरोग्य केंद्र,आश्रम शाळा,पाणी पुरवठा योजना आदी ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देत ब्लॅक स्पॉट पडताळणी करून दुरूस्ती कार्याला सुरूवात करण्यात आली.मेळघाटातील या दुर्गम भागात महावितरणकडून वीज पुरवठा होणाऱ्या गावात प्रत्यक्षात ग्राहकांची संख्या अत्यंत कमी आहे.वीज ग्राहकांनी वीज जोडणीसाठी अर्ज केल्यानंतर त्यांना तत्काळ वीज जोडणी देण्याची व्यवस्था करण्यात येईल. तसेच मेळघाटतील हा भाग अतीदुर्गम आणि व्याघ्रप्रकल्पाचा भाग आहे,भौगोलिक परिस्थितीसह जंगली जनावरांमुळे आपात्का लिन परिस्थितीत दुरूस्ती कालावधीला थोडा वेळ लागतो,त्यामुळे या काळात ग्राहकांनी सहकार्य करावे असे आवाहनही कार्यकारी अभियंता प्रदिप अंधारे यांनी केले आहे.

# अचलपूर तालुक्यातील हिरवी वांगी उत्पादक मालामाल !

## दररोज शेकडो टन वांगी जातात परराज्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अचलपूर** अचलपूर तालुक्यात सिंचनाची बऱ्यापैकी सुविधा असल्यामुळे संत्रा, केळी, पपई, सीताफळसह भाजीपाला पिकवत असताना हिरवी वांगी सध्या वांगी उत्पादकाना मालामाल बनवतेय.शेती करणं परवडत नसल्याची सतत ओरड होत असताना अचलपूर तालुक्यातील काही गावात वांगी उत्पादक मालामाल होत आहे. सलग सहा महिने केवळ वांग्याच्या उत्पादनातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. एक एकर शेती असागारा शेतकरी केवळ वागी विकून दिवसाला तीन ते चार हजार रुपये कमावतो या गावातून पूर्व विदर्भातील नागपूर, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, यवतमाळसह म.प्र.. छत्तीसगड, ओडिसा, तेलंगाणा, आध्रप्रदेश, तामिळनाडूराज्यात दररोज १०० टन वर वांगी जाताातपथ्रोट, परसापूर, हरम हे गाव पूर्वी मिरची, भुईमूग आणि कापसासाठी प्रसिद्ध होते. मिरची आणि कापूस या दोन्ही पिकांना या भागातून चागली मागणी होती. मागील वीस, पंचवीस वर्षात मात्र पथ्रोट येथील जांभळ्या वांग्यांसह हिरवी वांगी अतिशय चवदार आणि दर्जेदार यायला लागली यामुळे या भागात पथ्रोटच्या वांग्यांना मागणी वाढली. महाशिवरात्रीला वांगीचे की रोप वाटिकेत लावून रोप तयार केले जाते. एप्रिल, मे महिन्यात हिरवी बागीचे रोपाची लागवण केली जाते.दीड महिन्यानंतर वागी तोहण्यास सुरुवात होते. जून महिन्यात वांगी लागली की थेट डिसेंबर महिन्यापर्यंत शेतात भरपूर वांगी येतात. महिन्याच्या दर आठवहधाला वांग्यांचा तोड़ा होतो अर्थात वांगी तोडली जातात. वांगी उत्पादकाच्या माहितीनुसार एक एकर शेतात एकूणएकरी १० हजार रुपयांच्या वर वांगी प्रत्येक आठवडचाला तोडली जातात. जून महिन्यात तीनवेळा आणि जुलै महिन्यात



एकदा वांगी तोडली जातात. त्यातून एकूण २ लाख रुपयांचं उत्पन्न मिळत आणि मजी खर्च ५० हजार रुपये होतो. डिसेबर महिन्यापर्यंत प्रत्येक आठवत्चात वांग्याची अशीच तोड सुरू राहील.दर आठवडचात वांग्याची तोडणी आता सुरू झाली आहे. यातोडणीचा मात्र कुठलाही हिशेब नसतो. कधी एकरी दोन लाख रुपयांचा माल निम्तो, कधी पाच, सात, कधी दहा लाखांचा माल येतो, अस शेतकरी सांगतात. वांग्याची थेट शेतातूनच विक्री होते. दुसया दिवशी विकलेल्या मालाचे पैसे मिळतात. कोट्यवधी रुपयांचा व्यवहार अवघ्या सहा महिन्यांत होतो.अमरावती जिल्ह्यात जांभळ्या रंगाची वांगी सर्वाधिक खाल्ली जातात: मात्र अकोला, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, भंडारा या भागात हिरवी वांगी मोठ्या चवीन खातात जांभळ्या वांग्यापेक्षा हिरव्या वांग्यांना अधिक मागणी आहे. कर्नाटक, ओडिशा आणि आध्रप्रदेशात दररोज आमच्या गावातून ट्रॅक भरून वांगी जातात, अस व्यापारी सांगतात.–

# अमरावतीसह राज्यातील विविध प्रलंबित मागण्यांसाठी आमदार रवी राणा यांची लक्षवेधी सूचना

## अध्यक्षांकडून तत्काळ अहवाल मागविण्याचे आदेश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती** राज्य विधीमंडळाच्या सुरू असलेल्या अधिवेशनात आमदार रवी राणा यांनी अमरावती जिल्ह्यासह राज्यातील विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांच्याकडे लक्षवेधी सूचना सादर केली. ही सूचना त्यांनी प्रथम ऑनलाईन पाठवली होती, त्यानंतर लेखी स्वरूपातही सभागृहात सादर करण्यात आली. या मागण्यांची गांभीर्याने दखल घेत अध्यक्ष ड. नार्वेकर यांनी संबंधित विभागांकडून तत्काळ वस्तुनिष्ठ अहवाल मागविण्याचे निर्देश दिले.या पार्श्वभूमीवर आमदार राणा यांच्या नेतृत्वाखाली विविध सामाजिक संस्था, तीर्थक्षेत्रांचे प्रतिनिधी व हितचिंतकांनी अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांचा विशेष सत्कार केला. यावेळी उमेश ढोणे, शेखर बिसने, संदीप ससे, ड. रोहन शर्मा, हर्षल रेवने आदी मान्यवर उपस्थित होते.एकूण २८ मागण्या या लक्षवेधी सूचनेत समाविष्ट करण्यात आल्या असून त्या राज्य शासनाकडून मान्य होण्यासाठी आमदार राणा सातत्याने पाठपुरावा करत आहेत. या माध्यमातून त्यांनी शासनाकडून न्याय्य निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.(कलर बॉक्स मारणे)प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे:

अमरावती जिल्ह्यातील अवकाळी पावसामुळे झालेल्या शेती व घरांच्या नुकसानीसाठी तत्काळ मदत जाहीर करणे.

निम्न पेढी प्रकल्पग्रस्तांना एकरकमी मोबदला व प्लॉटवरील आर्थिक बोजा कमी करणे.

एमआयडीसीतील उद्योजकांना उद्योग विस्तारासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देणे.

धारणी व चिखलदरा तालुक्यातील पाणीटंचाईच्या प्रश्नावर तातडीने उपाययोजना करणे.

संत गाडगे बाबा समाधीस्थळ, संत अच्युत महाराज शेंदूरजना बाजार, वाल्मिकी मठ सामदा काशीपूर, रूनमोचन, कोंडेश्वर, तपोनेश्वर, अष्टमासिद्धी, गणोजा देवी या तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी निधी वितरित करणे.

बडनेरा येथे ई-बस डेपो, साईनगर येथे नवीन पोलीस ठाणे, बेलोरा पोलिस स्टेशनसाठी इमारत मंजुरी.

विविध संवर्गांतील आरोग्य सहाय्यक, सेविका व लिपिकांच्या पदभरतीस मान्यता देणे.

जलतरण स्पर्धा विजेत्या कर्मचाऱ्यांना विशेष वेतनवाढ, बदली धोरणात सुधारणा.

धारणी येथे स्वतंत्र एसटी आगार, अचलपूरला स्वतंत्र जिल्हा, अमरावती ग्रामीण व शहर तहसील कार्यालये, चुरणी तहसील मंजुरी.

बोगस बियाणे पुरवठादार कंपन्यांवर कारवाई.

महादेव कोळी समाजाच्या जाती प्रमाणपत्रासाठी ऐतिहासिक नोंदींचा पुनर्विचार.

अमरावती व मुंबईतील गौण खनिज व गृहनिर्माण घोटाळ्यांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणे.

# विश्वकर्मा कॉलनी व खानझोडे रेसिडेन्सीत चोरट्यांचा धुमाकूळ

## एकाच रात्री तीन घरफोड्या, लाखोंचा ऐवज लंपास





## नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अचलपूर,** अचलपूर परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देवमाळी ग्रामपंचायत क्षेत्रातील विश्वकर्मा कॉलनी व खानझोडे रेसिडेन्सी भागात अज्ञात चोरट्यांनी एकाच रात्रीत तीन ठिकाणी घरफोड्या करत लाखो रुपयांचा ऐवज लंपास केल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे या सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्या असून चोरटे चेहरे झाकून फिरताना स्पष्टपणे दिसून आले आहेत.या भागात मागील काही दिवसांत चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वी जानराव डहाके यांच्या घरात, जयसिंगपुरे यांच्या घराबाहेरून दोन सायकली, तसेच सोलव यांच्या घरीही चोरी झाली होती. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचं आणि असुरक्षिततेचं वातावरण निर्माण झालं आहे.खानझोडे रेसिडेन्सीमध्ये गणेश मधुकर रामटेके यांच्या घरातून मोबाईल, चांदीचे कडे व चार हजार रुपये रोख, नितीन बोंबडे यांच्या घरी दरवाजा तोडून मोबाईल आणि १० हजार रुपये रोख तर प्रशांत गुप्ता यांच्या घराबाहेरून दुचाकीचे टायर व व्हील चोरून नेण्यात आले. पोलिसांनी प्राप्त केलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये तिन्ही ते चार चोरटे रात्रीच्या सुमारास परिसरात फिरताना व चोरी करताना स्पष्टपणे दिसून येतात. चोरट्यांनी मास्क व रुमालाने आपले चेहरे झाकले होते. सदर घटनेच्या अनुषंगाने पोलीस तपास सुरू असून चोरट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.या घटना थांबवण्यासाठी परिसरात पोलीस गस्त वाढवावी, सुरक्षा यंत्रणा बळकट करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. अन्यथा नागरिकांचा संयम सुटेल, असा इशाराही देण्यात आला आहे.-

# मुलींच्या सुरक्षेसाठी शाळांमध्ये सीसीटीव्ही लावण्याची आमदार प्रताप अडसळ यांची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६अमरावती-** पासपोर्ट राज्यातील शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न गांभीर्याचा बनत चालला असतानाच, विधानसभेत आमदार प्रताप अडसळ यांनी महत्त्वपूर्ण विषय उपस्थित केला आहे. त्यांनी राज्यातील सर्व खासगी व शासकीय शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची मागणी सरकारकडे केली आहे.अडसळ म्हणाले की, अनेक वेळा शाळांच्या परिसरात अनुचित प्रकार घडत असतात. त्यावर वेळेवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि मुलींच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा अत्यंत आवश्यक आहे. शाळा हे विद्यार्थ्यांसाठी सुरक्षिततेचे स्थान असले पाहिजे, असेही त्यांनी यावेळी स्पष्टपणे नमूद केले.या मागणीला अनेक सदस्यांचा पाठिंबा मिळाला असून, सरकारने यावर तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविल्यास विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसोबतच शिस्तबद्ध वातावरण निर्माण होईल, असे शिक्षण तज्ज्ञांचेही मत आहे.

# टिपू सुलतान मार्केटजवळ पिस्तुलाने दहशत निर्माण करणारा इसम गाडगेनगर पोलीसांच्या जाळ्यात

## देशी बनावटीचे पिस्तुल जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**
गाडगेनगर पोलीस स्टेशनच्या डिटेक्शन पथकाने टिपू सुलतान मार्केट परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या २० वर्षीय युवकाला अटक करत त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्तुल जप्त केले. ही कारवाई १५ जुलै रोजी रात्री १२.५० च्या सुमारास करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी मोहम्मद अनस मोहम्मद शकील (रा. यास्मीननगर) याने किरकोळ कारणावरून लोकांना पिस्तुलाचा धाक दाखवला होता. याबाबत गोपनीय माहितीवरून पोलीसांनी टिपू सुलतान मार्केटच्या मागील भागात सापळा रचत आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडून कंबरेत खोचलेले १५,००० रुपये किमतीचे मॅगझीनसह देशी बनावटीचे पिस्तुल जप्त करण्यात आले.सदर आरोपीविरोधात गाडगेनगर पोलीस ठाण्यात कलम ३, २५ भारतीय हत्यार कायदा व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पोहवा भारत वानखडे करीत आहेत.ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे, सहायक आयुक्त अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोनि अतुल वर व क्राईम पोनि विजया पंधरे यांच्या देखरेखीखाली करण्यात आली.

# मेळघाटातील युवा नेता मन्नालाल दारसिंभे शिंदेसेनेत

## राष्ट्रिय पक्षातील नेत्यांची डोकेदुखी वाढणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६धारणी**
मेळघाटातील युवा नेतृत्व मानल्या जाणारे व महाराष्ट्र जनक्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मन्नालाल दारशिंभे यांनी मुंबई येथे जाऊन शिंदे सेनेत प्रवेश घेतल्याने मेळघाटात राजकीय भूकंप निर्मान झाला आहे त्यामुळे येत्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपंचायत च्या निवडणुकीमध्ये एक नवीनच नेता व पुन्हा त्यांची प्रजा समोर येणार असल्याने मेळघाटातील राजकारणाचे चित्र बदलले आहे

महाराष्ट्र जनकांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष आणि मेलघाटातील कट्टर आदिवासी युवा नेता मन्नालाल दारशिंभे यांनी सोमवारी शिवसेना शिंदे गटात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत प्रवेश करून गळ्यात भगवा दुपट्टा घातला त्यावेळी राज्याचे अनुसूचित जाती आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ शिवसेनेचे राष्ट्रीय सचिव माजी आमदार कॅप्टन अभीजित अडसूळ शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमुख प्रमोद सिंग गड्रेल युवा जिल्हा प्रमुख प्रितेश अवघड आधी उपस्थित होते या युवा नेत्याच्या प्रवेशामुळे मेळघाटातील राजकारणात मोठा भूकंप निर्माण झाला आहे त्यामुळे येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपंचायत निवडणुकीत मनाला दार शिंदे हे शिंदे सेनेचे युवा नेते त्यांचे नवे जिल्हा परिषद सर्कल मध्ये उमेदवार उभे करून येणाऱ्या सर्व निवडणुकीला समोर जाणार असल्याने राष्ट्रीय पक्षातील नेत्यांची गोची चांगलीच वाढली आहे त्यामुळे या त्यांच्या शिंदेसेनेतील प्रवेशामुळे आदिवासी कार्यकर्त्यांसह आदिवासी बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पर्यावरण पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे दरवर्षी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन, जैवविविधता संवर्धन, अपारंपारिक उर्जा स्त्रोताचा वापर, जनजागृती व पर्यावरण संवर्धन आदी क्षेत्रात पर्यावरणपुरक उत्कृष्ट कार्य करणा-या विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील सर्व महाविद्यालये, शाळा व सामाजिक भावनेतून पर्यावरण संवर्धनाचे कार्य करणारे, सक्षम प्राधिकारणांकडे नोंदणीकृत विविध प्रतिष्ठाने आणि स्वयंसेवी संस्था यांना संस्थागत ‘अ’ गटात, तर पर्यावरण संवर्धनाचे कार्य करणारे व्यक्ती यांना ‘ब’ गटात पर्यावरण पुरस्कार प्रदान केल्या जातो. आजवर या क्षेत्रात कार्य करणा-या अनेक संस्था व व्यक्तींना हा पुरस्कार देवून विद्यापीठाच्यावतीने सन्मानित करण्यात आले आहे. सदर पुरस्कार राष्ट्रीय प्रदुषण नियंत्रण दिन दि. ०२ डिसेंबर, २०२५ रोजी ससन्मान विद्यापीठाव्दारे प्रदान केल्या जाईल.

### असे राहणार पुरस्काराचे स्वरुप

विद्यापीठाच्यावतीने दिला जाणारा पर्यावरण पुरस्कार हा पर्यावरण संवर्धनासाठी कार्य करणा-या संस्था व व्यक्ती गटात प्रदान केल्या जातो. या पुरस्काराचे स्वरुप स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ, संस्थागटात रु. १५,००० /- रु, रोख, तर व्यक्तीगटात रु. १०,००० /- रोख असे आहे. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

# मेळघाटात मध्यवर्ती भागात अत्याधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध करा

## प्राचार्य सुखदेवराव पवार यांची मागणी गेल्या ७वर्षापासून प्रस्ताव पडून



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अचलपूर**
मेळघाटातील मध्यवर्ती भागात सर्व सोयी युक्त अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध करावी अशी मागणी भाजपाचे प्राचार्य सुखदेवराव पवार यांनी केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केलेली आहे हतरू भांडुम राणीगाव तांगडा वैराट इत्यादी दुर्गम भागातून १७० किलोमीटर अंतरावरून गंभीर आजार असलेली व्यक्ती अमरावतीच्या आरोग्य विभागात जाईपर्यंत मधातच दगावल्याची अनेक उदाहरणे हे अंतर कमी करण्याच्या दृष्टीने मेळघाट मधील मध्यवर्ती ठिकाणी सर्व सोयी युक्त अत्याधुनिक आरोग्याची सोय उपलब्ध झाल्यास होणारे मृत्यूचे प्रमाण या परिसराला लागलेला कुपोषणाचा कलंक शिकलसेल सारखा दुर्धर आजार आणि वारंवार होणारे अपघात जंगलात होणारे वन्य पशूंचे हल्ले पासून होणारी जीवित हानी टाळण्यास शासकीय वैद्यकीय महाविद्यालयचा प्रस्ताव सात वर्षापासून जिल्हाधिकारी ,जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा आरोग्य अधिकारी आरोग्य मंत्री महाराष्ट्र राज्य आरोग्य शिक्षण मंत्री आणि पालकमंत्री अमरावती जिल्हा त्यांचे कडे मेळघाटची जनता या समस्येतून मुक्त होण्याकरिता विनंती म्हणून प्राचार्य सुखदेवराव पवार यांनी प्रस्तावाच्या प्रति पाठविल्या आहेत.

संबंधित प्रस्ताव सात वर्षापासून वारंवार पाठपुरावा करीत असून आज या प्रस्तावाला भारताचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सहिनिशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला आहे. या प्रस्तावाच्या सर्व बाजू तपासून स्थळ पाहणी करून मेळघाटच्या जनतेचा जिव्हाळ्याचा आणि अत्यंत महत्त्वाचा आरोग्य विषयक प्रस्ताव मंजूर करतील अशी अपेक्षा आहे.

**-प्राचार्य सुखदेव पवार जिल्हाध्यक्ष**
भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा

